# सर्वसमावेशक शिक्षणाचे स्वरूप आणि अध्ययन अक्षम बालकांचे शिक्षण

**डॉ. शशिकांत अन्नदाते**
एम.ए., एम.एड., नेट, सेट, पीएच.डी
सहायक प्राध्यापक,
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

## प्रास्ताविक

भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेत स्वातंत्र्य आणि समानतेच्या हक्कांचा पुरस्कार केलेला आहे. तसेच राज्यघटनेच्या कलम ४५ मधील मार्गदर्शक तत्वांमध्ये विविध गरजा असणाऱ्या दिव्यांग व्यक्तिंसह सर्वांनाच शिक्षणाचा हक्क मिळवून देण्यासाठी शासनाने प्रयत्न करण्याचा उल्लेख आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ (अ) कलमात वयाच्या ६ ते १४ वर्षापर्यंत शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात आले आहे. यानुसार शासनाने आपली जबाबदारी ओळखून सर्वसमावेशक शिक्षणाच्या अंमलबजावणीसाठी विविध कायदे व योजना तयार केल्या आहेत.

## सर्वसमावेशक शिक्षणाची संकल्पना

१. **युनेस्को** – “सर्वसमावेशक शिक्षण हि एक अशी संकल्पना आहे कि, ज्यात सर्व अध्ययनकर्त्यांचा वैविध्यपूर्ण गरजा, अध्ययन संस्कृती, समुदाय यामधील सहभाग वाढवून पूर्ण केल्या जातात आणि त्यांचे शिक्षण प्रक्रियेतील आणि शिक्षणापासूनचे वंचितत्व कमी केले जाते.”

२. “प्रत्येकाच्या शारीरिक व मानसिक क्षमता वेगवेगळ्या असतात. त्यामुळे त्यांच्या आवडीनिवडी, गरज, अभ्यासाच्या पद्धती, आकलनक्षमता, आंतरक्रियेच्या पद्धती वेगवेगळ्या असतात. अशा विविध प्रकारच्या विद्यार्थ्यांना एकत्रितपणे शिक्षण देण्याच्या प्रवाहास सर्वसमावेशक शिक्षण असे म्हणतात.”

## सर्वसमावेशक शिक्षणाची वैशिष्ट्ये

१. दिव्यांग विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांबरोबर शिक्षण घेतात.
२. दिव्यांग विद्यार्थ्यांना दिव्यांगत्वावरून कोणीही शाळाप्रवेश नाकारू शकत नाही.
३. दिव्यांग विद्यार्थी इतर शिक्षकांबरोबर विशेष प्रशिक्षित शिक्षकांकडून मार्गदर्शन घेतात.
४. शाळेमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना लागणारी विविध साधने व अध्ययन साहित्य उपलब्ध असते.
५. शाळेमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी भौतिक सुविधांमह्ये आवश्यक ते बदल केले जातात. उदा. व्हीलचेअर, रॅम्प इत्यादी.
६. सर्वसमावेशक शिक्षणात नियमित वेळापत्रकाव्यतिरिक्त गरजाधिष्ठीत मार्गदर्शन तासिका असतात.त्या तासिकेत विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना तज्ञ मार्गदर्शक मार्गदर्शन करतात.
७. सर्वसमावेशक शिक्षणात वेगवेगळ्या गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या एकत्रितपणे शैक्षणिक कृती घेतल्या जातात.
८. शाळा व महाविद्यालयातर्फे सर्वसमावेशक शिक्षण जाणीवजागृती करण्यासाठी विद्यार्थी, पालक आणि समुदायासाठी कार्यक्रम घेतले जातात.
९. दिव्यांग विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची संधी मिळाल्याने एकमेकांशी जिव्हाळ्याची बांधिलकी तयार होते.

शासनाकडून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी दिव्यांग शिष्यवृत्ती, दिव्यांग कल्याण योजना, दिव्यांग कल्याण राज्य पुरस्कार अशा योजना राबविल्या जातात. ४० टक्के व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेले विद्यार्थी दिव्यांग योजनांचा लाभ घेऊ शकतात.

## वैयक्तिक शिक्षण कार्यक्रम (IEP-Individualised Education programme)

सर्वसमावेशक शिक्षणाचा अभ्यासक्रम हा बालकेंद्रित, लवचिक, सहभागीतेस प्रोत्साहन देणारा आणि पालकांबरोबर घनिष्ठ नातेसंबंध निर्माण करणारा असावा.

सर्वसमावेशक शिक्षणातून सर्व बालकांबरोबर विशेष बालकांच्याही गरजा पूर्ण होतात. बालक व त्यांच्या गरजांचे मूल्यमापन केल्यावर शिक्षक, पालक व विशेष बालकांचे शिक्षक यानी 'वैयक्तिक शिक्षण कार्यक्रम' आखावा.

**वैयक्तिक शिक्षण कार्यक्रमात समाविष्ट घटक**

१. बालकाची सद्यस्थितीतील पातळी
२. वार्षिक ध्येय
३. सुधारित शैक्षणिक अनुभव
४. मूल्यमापन किंवा प्रगतीचे अवलोकन

विशेष गरजा असणाऱ्या बालकांना त्यांचे पालक, समवयस्क गट, शिक्षक यांनी लक्षण पुरविणे व त्यांची विशेष काळजी घेणे आवश्यक असते. तसेच समाजाचा त्यांच्याकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टीकोन तयार व्हावा लागतो म्हणजे याचा हातभार त्यांच्या विकासाला लागतो. पालक व शिक्षक यांनी या बालकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी समाजातील यशस्वी घटक बनण्यासाठी एकत्र व जोडीने काम करण्याची गरज आहे.

**सर्वसमावेशक शिक्षणाचे फायदे**

१. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांसोबत एकत्रितपणे आंतरक्रिया करण्याची सवय झाल्याने त्यांचे सामाजीकरण लवकर होते.
२. सर्व विद्यार्थ्यांना एकमेकांच्या व्यक्तीमत्वातील वेगळेपणा लक्षात येतो, त्यामुळे एकत्रितपणे राहणे, सहकार्य करणे, आदर करणे या गुणांचा विकास होतो.

**अध्ययन अक्षमता (Learning disability)**

अध्ययन अक्षमता असलेली बालके म्हणजे कि ज्यांना गंभीर अध्ययन अक्षमता असतात. अशी बालके इतर बालकांच्या तुलनेत अध्ययन करणे व समजून घेणे या क्षमतामध्ये कमी पडतात.

**अध्ययन अक्षमता व्याख्या**

**कावले आणि फॉरनेस** यांच्या मते, "अध्ययन अक्षमता असलेले लोक एका विशिष्ट गटात मोडतात, पण त्या सर्वांमध्ये एक समान समया असते. त्या सर्वांना एकसारखे किंवा परिणामकारक अध्ययन इतर मुलांसारखे करता येत नाही. तरीही बऱ्याच जनांची बुद्धीमत्ता हि सामान्य असते, परंतु त्यांचे शैक्षणिक कार्य त्यांच्या वर्गातील मुलांपेक्षा लक्षणीयरित्या मागे असते. त्यापैकी काहीना गणितीय अध्ययनात अडथळे येतात. पण बऱ्याच जणांना वाचन व लेखन यात तज्ञता मिळविण्यास खूप अडचणी येतात."

**अध्ययन अक्षमतेची कारणे**

अ. **आनुवंशिक घटक** – काही बालकांच्या बाबतीत अध्ययन अक्षमता निर्माण होण्यासाठी आनुवंशिक घटक हे मुख्यत्वे जबाबदार असतात. तसेच अध्ययन अक्षमतेमध्ये दिसून येणारी वैशिष्ट्ये ही पिढ्यानपिढ्या संक्रमित होतांना दिसतात.

ब. **जैविक घटक** – यामध्ये असे दिसून येते कि, अध्ययन अक्षमता असणाऱ्या बालकांच्या मध्यवर्ती मज्जासंस्थेतील मेंदू व मज्जारज्जूतील अकार्यक्षमता कार्यातील बिघाडामुळे तसेच इतर काही शास्त्रज्ञाना असे वाटते कि, ज्या बालकांना अध्ययन अक्षमता असते अशा बालकांच्या मेंदूतील दुखापत व मध्यवर्ती मज्जा संस्तेतील बिघाड झालेला असतो.

क. **परिवेशीय घटक** – बऱ्याच बालकांच्या बाबतीत अध्ययन अक्षमता ही व्यक्तीच्या भौतिक, सामाजिक, संस्कुतिक आणि शैक्षणिक वातावरणातून निर्माण होते.

**अध्ययन अक्षमतेची लक्षणे**

बालकात पुढील चार प्रकारच्या अक्षमता दिसून येतात.

अ. **वाचन अक्षमता** – योग्य सूचना मिळून, पुरेशी बुद्धिमत्ता असूनही आणि सामाजिक व सांकृतिक संधी मिळूनही वाचायला शिकण्यामध्ये अडथळे येतात त्यास वाचन अक्षमता असे म्हणतात. वाचन अक्षमतेची लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत.

- ज्या उताऱ्याचे वाचन करतात त्याचे आकलन होण्यामध्ये कठीण जाते.
- वाचताना डावी व उजवी दिशा यामध्ये गोंधळ होतो.
- शब्दातील अक्षरांचा क्रम आठवता येत नाही.
- आकृती व पृष्ठभाग यातील भेद समजत नाही.
- अतिक्रियाशील, लहरी, चित्त विचलित होणारे आणि अल्प अवधान असणारी बालके असतात.

**वाचन अक्षमता असणाऱ्या बालकांबाबत पुढील दृष्टीकोन ठेवावा.**

१. अत्यंत सखोलतेने लक्ष ठेवून वाचताना मदत करावी. वाचनातील उणीवा मार्गदर्शन करून कमी करण्याचा प्रयत्न करावा.
२. मित्र व समवयस्क यांच्याकडून त्यांना शिकणे सोपे जाते.
३. विशिष्ट शैक्षणिक साधनांचा वापर करावा.
४. विद्यार्थी व पालक यांना शिक्षकांनी समुपदेशन करावे.

**ब. लेखन अक्षमता**

लेखन अक्षमता ही एक लिहिण्याच्या क्षमतेमधील विकृती आहे. लेखन अक्षमता असलेले लोक काही ठराविक पातळीपर्यंत लिखाण करू शकतात, परंतु बऱ्याच वेळेला बोटांच्या सफाईदार कौशल्यामध्ये त्यांना अडचणी निर्माण होतात. बाल्यावस्थेत साधारण ही विकृती बालक पहिल्यांदा लिहायला लागते तेव्हा निर्माण होते. बालक योग्य आकारांची अक्षरे योग्य त्या ठिकाणी लिहिण्याचा प्रयत्न करतात. लेखन अक्षमतेची लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत.

- लिहिताना हातात वेदना जाणवतात.
- या वेदना साधारणत: हाताच्या मध्यभागी सुरु होतात.
- काही अक्षरे किंवा अंक लिहायचे लक्षात राहत नाही.
- इंग्रजीमध्ये मोठी अक्षरे व लहान अक्षरे यातील फरक समजत नाही.
- लेखन एका सरळ रेषेत करता येत नाही.

**लेखन अक्षमता असणाऱ्या बालकांबाबत पुढील दृष्टीकोन ठेवावा.**

१. पालक व शिक्षक यांचे विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन आवश्यक आहे.
२. बालकाचे मूल्यमापन तोंडी घ्यावे.
३. शिक्षकांनी पालक व विद्यार्थी यांचे समुपदेशन करावे.

क. **गणितीय अध्ययन अक्षमता** – यामध्ये प्राथमिक अंकगणित शिकण्यामध्ये अडचणी येतात. गणितीय अक्षमतेची लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत.

- गणितीय संकल्पनेचा अर्थ लावता येत नाही.
- मन एकाग्र करणे अवघड जाते.
- अंकगणितीय चिन्हांमध्ये गोंधळ होतो.
- गुणाकार करतांना अडथळे येतात.
- एका क्रमाने नंबर वाचता येत नाही.

**गणितीय अक्षमता असलेल्या बालकांप्रति पुढील दृष्टीकोन ठेवावा.**

१. गणितासाठी अधिक तयारी करून घ्यावी.
२. विद्यार्थ्यांवरील ताण कमी करण्यासाठी बोर्ड पातळीवरील परीक्षेत त्यांना गणित विषयातून सुट द्यावी.
३. शिक्षक व पालक यांनी विद्यार्थ्यांचे वारंवार समुपदेशन करावे.

**संदर्भ ग्रंथ –**

१. जगताप ह. ना. (२००५), शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, नित्यनूतन प्रकाशन, पुणे
२. पारसनीस न.रा. (१९९०), प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र, नित्यनूतन प्रकाशन
३. कढे, पुष्पलता (२००६), बालविकासाच्या पाऊलखुणा, नवनीत प्रकाशन, मुंबई